**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

===============================================================

जावक क्रमांक — ५०७३ / ७८ दिनांक :- ०५ डिसेंबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

## म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध – गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे

### म्हाडा पुणे मंडळातर्फे ५८६३ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. ०५ डिसेंबर, २०२३ :- म्हाडाच्या माध्यमातून तसेच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) यांसारख्या विविध शासकीय योजनांद्वारे राज्यातील प्रत्येक नागरिकाला हक्काचे घर मिळावे याकरिता महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने राज्यात जास्तीत जास्त घरे निर्माण व्हावीत याकरिता गृहनिर्मिती संदर्भात वेळोवेळी नियमावलीमध्ये बदल केले आहेत व गृहनिर्मितीला वेग देणारी धोरण जाहीर केली आहेत. पुणे जिल्ह्यात म्हाडाला परवडणाऱ्या दरात सर्वसामान्यांसाठी अधिकाधिक घरे उभारता यावी, यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांनी आज केले.

म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेंतर्गत उभारलेल्या ५८६३ सदनिकांच्या विक्रीकरिता पुणे जिल्हा परिषदेच्या सभागृहात गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांच्या हस्ते आज संगणकीय सोडत काढण्यात आली. यावेळी श्री. सावे बोलत होते.

श्री. सावे म्हणाले की, पुणे मंडळाच्या ५८६३ सदनिकांसाठी ७७,२८० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ५९,७८८ अर्जदारांचे अनामत रकमेसह अर्ज प्राप्त झाले आहेत. म्हणजेच सुमारे १० पटीने अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. पुणे शहरात ही स्थिती असल्याचे दिसून येत असून यावरून राज्यातील घरांची कमतरता अधोरेखित होत आहे. यामुळे राज्य शासनाचे गृहनिर्मिती क्षेत्रामधील उत्तरदायित्व अधिक वाढले आहे . ते पुढे म्हणाले, की राज्यातील प्रत्येक नागरिकाला हक्काचे घर मिळावे याकरिता शासन कटिबद्ध आहे. राज्यात जास्तीत जास्त घरे निर्माण व्हावीत याकरिता गृहनिर्मिती संदर्भात वेळोवेळी नियमावलीमध्ये बदल केले आहेत व गृह निर्मितीला वेग देणारी धोरणे जाहीर केले आहेत. २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून घरांचा साठा निर्माण होऊ शकतो तसेच सोडत काढण्याची वारंवारता देखील म्हाडाला वाढविता येईल. राज्य शासनाने गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. बृहन्मुंबईतील ५८ बंद/आजारी गिरण्यांमधील यापूर्वी झालेल्या सोडतीमध्ये यशस्वी न झालेल्या एकूण १,५०,४८४ गिरणी कामगार व त्यांच्या वारसांची पात्रता निश्चिती करण्याकरिता कालबद्ध विशेष अभियान सुरू आहे. आतापर्यंत ७०२६७ गिरणी कामगार / वारसांनी ऑनलाइन पद्धतीने कागदपत्रे सादर केले असून

१०२०० गिरणी कामगारांनी ऑफलाइन पद्धतीने कागदपत्रे सादर केली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील रे नगर येथे विडी कामगारांसाठी ३०००० सदनिका उभारणीचे काम प्रगतीपथावर असून काही घरांचे लोकार्पन लवकरच केले जाणार असल्याचे श्री. सावे यांनी सांगितले.

याप्रसंगी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल म्हणाले की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) स्थापनेला आज ४६ वर्ष पूर्ण होत आहेत. यावेळी श्री. जयस्वाल यांनी सर्व नागरिकांना म्हाडाच्या ४७ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या व सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकाला हक्काचा निवारा मिळावा या उद्दीष्टावर म्हाडाची स्थापना झाली असून गेल्या सात दशकांच्या कालावधीत म्हाडातर्फे सुमारे नऊ लाख कुटुंबीयांना हक्काचा निवारा उपलब्ध करून दिला आहे. तसेच पुणे मंडळातर्फे सन २०१६ पासून ११ संगणकीय सोडतीच्या माध्यमातून २५००० सदनिका उपलब्ध करून दिल्या आहेत. मंडळाने विविध स्रोतांतून संपादित जमिनी आता कमी होत चालल्या असून सर्वसामान्यांसाठी गृहनिर्मिती करणे अवघड होत आहे, असे सांगत पुढे त्यांनी कार्यक्रमास उपस्थित असलेले पुणे जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले की, सुमारे ७० हेक्टर शासकीय जमिनीच्या मागणीचे प्रस्ताव पुणे मंडळातर्फे शासनाकडे सादर केले आहेत. या मागणीचा योग्य पाठपुरावा केल्यास अधिकाधिक गृहनिर्मिती करणे म्हाडास शक्य होणार आहे, असे श्री. जयस्वाल यांनी सांगितले. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत म्हाडाला गृहसाठा प्राप्त होत असून लवकरच सर्वसामान्यांसाठी सोडत काढणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले. एकल इमारतीच्या पुनर्विकासास परवानगी मिळाल्याने पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील म्हाडाच्या वसाहतींमधील सुमारे ३०० सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे शहरात अंदाजे २५,००० नवीन सदनिका उपलब्ध होऊ शकणार आहेत. पुणे मंडळाने सोडतीचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अशोक पाटील व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

पुणे मंडळाच्या संगणकीय सोडतीत संत तुकाराम नगर पिंपरी चिंचवड योजना क्रमांक ७६२ -ए या योजनेची सोडत जाहीर करण्यात आली व सर्व प्रथम विजेते विष्णुकांत राठी ठरले. या सोडत प्रसंगी सभागृहात उपस्थित विजेत्या अर्जदारांचा म्हाडातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी विजेत्या अर्जदारांनी मनोगत व्यक्त करताना म्हाडाच्या पारदर्शक संगणकीय सोडत प्रणालीचे कौतुक केले.

यावेळी व्यासपीठावर विभागीय आयुक्त श्री. सौरभ राव, पुणे जिल्हाधिकारी श्री. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त श्री. राहुल महिवाल, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश चव्हाण, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखेडे, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अशोक पाटील आदी उपस्थित होते.

म्हाडाद्वारे वेबकास्टिंगच्या माध्यमातून घरबसल्या सोडतीचे थेट प्रक्षेपण बघण्याच्या सुविधेचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. सोडतीचा निकाल https://mhada.gov.in व https://lottery.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळांवर अर्जदारांसाठी प्रदर्शित करण्यात आला आहे.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण






पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे
म्हाडा


महाराष्ट्र शासन (गृहनिर्माण विभाग)
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे
(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)




Maharashtra Housing and Area Development Authority
PB23_02 - Pune Board MHADA Scheme
म्हाडा
MHADA
राखीव


ASHABAI KISAN WAGH
SATISH MAHADEV GEJAGE


3430003774
ROHAN KISHOR PANDOLE
F-1, 7, 701
3430042052
AKSHAY FAKKAD SHELKE
F-1, 7, 703
3430071469
BORAWAKE ABHIJIT RAJENDRA
F-1, 8, 802


म्हाडा
उत्कृष्ट दर्जा...वाजवी किंमत...
पारदर्शक व्यवहार